महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हॉट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३३० वा दिनांक : १३/११/२०२५ वार : गुरूवार

## फुकटचा ताठा अन् नाव उबाठा : एकनाथ शिंदेंची उद्धव ठाकरेंवर बोचरी टीका



**परभणी :** शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी अतिवृष्टी अनुदानाच्या मुद्यावरून मराठवाड्याचा दौरा करत महायुती सरकारवर 'दगाबाज' म्हणत टीका केली होती. या टीकेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठवाडा दौऱ्यावर असताना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. काँग्रेसच्या दावणीला शिवसेना कोणी बांधली? खरे दगाबाज कोण हे जनतेने ओळखले आहे, अशा शब्दांत शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर पलटवार केला. तसेच, ठाकरेंनी मराठवाड्याचा दौरा करताना शेतकऱ्यांना 'एक बिस्किटचा पुडाही' दिला नाही, अशी खोचक टीका करत 'फुकटचा ताठा अन् नाव उबाठा' असा उपरोधिक हल्लाबोलही केला.

उद्धव ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी मराठवाड्याचा दौरा करून, अतिवृष्टी अनुदानावरून महायुती सरकारला 'दगाबाज' संबोधले होते आणि मतदारांना त्यांना 'वोटबंदी' करण्याचे आवाहन केले होते. या आरोपांचा समाचार घेण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी आज मराठवाड्यातील परभणी येथे आयोजित केलेल्या त्यांच्या पक्षाच्या मेळाव्यात जोरदार प्रत्युत्तर दिले. आपल्या भाषणात शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर खोचक टीका करताना, "नुसता फुकटचा ताठा अन् नाव उबाठा" असे म्हटले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, मराठवाड्यात नुसतेच येऊन गेले, साधा बिस्किटचा पुडाही देऊन गेले नाहीत. माझ्या हातात काही नाही, असे ते म्हणाले. पण जेव्हा त्यांच्या हातात सत्ता होती, तेव्हा तरी त्यांनी काही दिले होते का? असा सवाल त्यांनी केला. आम्हाला दगाबाज म्हणता, पण खरी दगाबाजी कुणी केली? काँग्रेसच्या दावणीला शिवसेना कुणी बांधली? हे जनतेने ओळखले आहे. म्हणूनच जनता आमच्या पाठीशी ठाम उभी आहे, असे म्हणत त्यांनी उद्धव ठाकरेंच्या आरोपांना सडेतोड उत्तर दिले.

जालना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख भास्कर आंबेकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी आंबेकर यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर थेट निशाणा साधला. ३९ वर्षे संघटनेत राहूनही जर दुसऱ्या पक्षातून आलेल्यांना विधान परिषदेवर किंवा राज्यसभेवर पाठवले जात असेल, तर निष्ठावंतांची तुमच्याकडे काय किंमत आहे? असा सवाल त्यांनी केला. काँग्रेसमधून आलेल्या प्रियंका चतुर्वेदी साध्या नगरसेवकही नसताना सहा महिन्यांत राज्यसभेवर कशा गेल्या? या लोकांकडे कोणती जादू आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आम्ही लोकांच्या प्रश्नांवर काम करतो आणि गुन्हे दाखल करून घेतो, पण हे आयते आलेले लोक मोठे कसे होतात? असा खडा सवाल करत, कार्यकर्त्यांशी संबंध नसणे हा उद्धव ठाकरे यांचा वीक पॉईंट आहे, अशी स्पष्ट भूमिका आंबेकर यांनी मांडली.

## सुप्रिया सुळेंचा अजित पवारांना 'युती'चा प्रस्ताव



**पुणे :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजले असून नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी मतदानाच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी पुन्हा एकत्र येण्याच्या तयारीत असल्याची चिन्हे आहेत. शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे स्थानिक निवडणुकांमध्ये एकत्र येण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही राष्ट्रवादी गटांमध्ये संवाद सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने अजित पवार आणि त्यांच्या भगिनी सुप्रिया सुळे यांच्यात एकत्र येण्याबाबत चर्चा झाली असल्याची माहिती पिंपरी-चिंचवडमधील अजित पवार गटाचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी 'एबीपी माझा'शी बोलताना दिली आहे. अजित पवार आणि सुप्रिया सुळे या भाऊ-बहिणींचा एकत्र येण्याबाबत संवाद झाला आहे. अजित दादा लवकरच शरद पवार यांच्याशी याबद्दल अंतिम चर्चा करणार असल्याचा दावा योगेश बहल यांनी केला आहे. आगामी महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत मी अजित दादांशी चर्चा केली, त्यावेळी स्वतः अजित पवारांनी ही माहिती दिल्याचेही बहल यांनी म्हटले आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांत दोन्ही राष्ट्रवादी काही ठिकाणी स्थानिक निवडणुकांमध्ये एकत्र काम करताना दिसले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड नगरपालिका निवडणुकीत दोन्ही गटांनी युती केली असून, यासाठी कॅबिनेट मंत्री हसन मुश्रीफ यांनी मध्यस्थी केली असल्याचे समजते. अशाच प्रकारे बीड आणि सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुका येथेही दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्याचे चित्र दिसून आले आहे. तर दुसरीकडे जळगाव जिल्ह्यात देखील भाजपला रोखण्यासाठी गरज भासल्यास आम्ही शिंदे गटासह अजितदादांच्या गटाशी युती करू, असे संकेत शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांनी केले होते.

दरम्यान, राज्याच्या राजकारणात 'राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी' अशी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर आता 'राष्ट्रवादी एकत्र' या नव्या समीकरणामुळे राजकीय रंगत वाढली आहे. येत्या काही दिवसांत अजित पवार आणि शरद पवार या दोघांमधील चर्चेनंतर यावर अधिकृत निर्णय होण्याची शक्यता आहे.

## शिवसेनेवर २१, २२ जानेवारीला सलग २ दिवस होणार सुनावणी




**नवी दिल्ली :** शिवसेना पक्ष व चिन्हाबाबत आज अखेर सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणीला सुरूवात झाली. त्यात न्यायालयाने या प्रकरणी दोन्ही पक्षकारांना युक्तिवादासाठी किती वेळ लागेल? अशी विचारणा करत त्यांची मते जाणून घेतली. त्यानंतर सुनावणी २१ जानेवारीपर्यंत लांबणीवर टाकली. कोर्टाने या प्रकरणी २१ व २२ असे सलग दोन दिवस सुनावणी होण्याचे संकेत दिलेत. त्यामुळे पुढच्या सुनावणीत न्यायालय दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून आपला निकाल देऊ शकते किंवा तो राखून ठेवू शकते. या सुनावणीवरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे राजकीय भवितव्य ठरणार आहे.

आज न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठापुढे शिवसेना प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणी सुरू होताच कोर्टाने ठाकरे व शिंदे गटाला तुम्हाला युक्तिवादासाठी किती वेळ लागेल? याची विचारणा केली. त्यावर ठाकरे गटाचे वकील ज्येष्ठ विधिज्ञ देवदत्त कामत यांनी आपल्याला २ तास पुरेसे असल्याचे स्पष्ट केले. तर वकील डॉक्टर ए एम सिंघवी यांनी आपल्याला किमान ३ तास लागतील असे नमूद केले. त्यानंतर कोर्टाने या प्रकरणी काही मुद्दे एकमेकांशी जुळणारे असू शकतात असे नमूद करत सुनावणी २१ जानेवारीपर्यंत तहकूब केली.

सुप्रीम कोर्ट यासंबंधी म्हणाले, या प्रकरणी काही मुद्दे एकमेकांशी जुळणारे असू शकतात. पण प्रथम, शिवसेनेच्या प्रकरणात युक्तिवाद सुरू होतील. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या केसेस येतील. याचिकाकर्त्या पक्षाला युक्तिवादासाठी ३ तासांचा वेळ दिला जाईल. तर प्रतिवादींना २ तासांचा वेळ दिला जाईल. दोन्ही पक्षांना युक्तिवाद पूर्ण करण्यासाठी व सोयीचे संकलन करण्यासाठी १ नोडल वकील नियुक्त करता येईल. या प्रकरणी २१ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वा. सुनावणी होईल. त्यानंतर हे प्रकरण दुसऱ्या दिवशी म्हणजे २२ जानेवारी रोजीही ऐकले जाईल. याचा अर्थ या प्रकरणी २१ व २२ जानेवारी रोजी सलग २ दिवस या प्रकरणाची सुनावणी होणार आहे.

ज्येष्ठ विधिज्ञ असीम सरोदे यांनी सुनावणी २१ जानेवारी रोजी संपून निकाल येईल असा विश्वास व्यक्त केला आहे. कोर्टाने आज दोन्ही पक्षांना युक्तिवादासाठी ५ तासांचा अवधी दिला आहे. त्यात एखादा तास मागेपुढे होऊ शकतो. गरज भासली तर ही सुनावणी दुसऱ्या दिवशीही (२२ जानेवारी) कंटिन्यू केली जाईल. हे मी नाही तर कोर्टाने सांगितले आहे. कारण, महाराष्ट्रातील काही लोक म्हणतात तुम्ही सांगता तसे होत नाही. पण मी माझे नव्हे तर कोर्टाने जे म्हटले ते सांगत आहे. आता कोर्टाने जे सांगितले तसे ते करत नसतील तर आपण काय करणार? असे ते म्हणाले.

विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०२२ मध्ये तत्कालीन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविरोधात उघड बंड केले होते. त्यांनी आपल्या समर्थक आमदारांसह प्रथम गुजरात व तेथून गुवाहाटीला प्रयान केले होते. शिंदे यांनी नंतर आपल्या समर्थक आमदार व खासदारांच्या संख्याबळाच्या आधारावर शिवसेना पक्ष व चिन्हावर दावा सांगितला होता. त्यासंबंधीचा कायदेशीर लढा केंद्रीय निवडणूक आयोगापुढे झाला. त्यात आयोगाने संख्याबळाच्या आधारावर शिवसेना पक्ष व चिन्ह हे उद्धव ठाकरे यांच्याकडून काढून शिंदे यांच्या गटाला दिले.

उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या या निर्णयाला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले. त्यांच्या या याचिकेसह इतर काही याचिकांवर आज सुप्रीम कोर्टात एकत्रित सुनावणी होण्याची शक्यता आहे. कोर्टाच्या १२ नोव्हेंबरच्या कामकाज यादीनुसार हे प्रकरण सुनावणीसाठी १९ व्या क्रमांकावर आहे. या सुनावणीत अनेक घटनात्मक व राजकीय मुद्यांवर उहापोह होण्याचीही शक्यता आहे. दुसरीकडे, ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी आजच्या सुनावणीत आपल्याच पक्षाचा विजय होणार असल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ नोव्हेंबर २०२५


# कै. के. द. वडजीकर उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार प्रविण देशपांडे यांना प्रदान




**छत्रपती संभाजीनगर :-** जीवन विकास ग्रंथालयातर्फे मराठवाड्यातील सार्वजनिक ग्रंथालयात कार्यरत असलेल्या एका उत्कृष्ट ग्रंथपालास दरवर्षी कै. के. द.वडजीकर यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो. यावर्षीचा हा पुरस्कार बदनापूर येथील स्वामी विवेकानंद वाचनालयाचे ग्रंथपाल प्रविण देविदासराव देशपांडे यांना. प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, प्रमुख अतिथी विभागीय ग्रंथालयाचे प्रमुख अधिकारी संतोष जाधव यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम देऊन देशपांडे यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर जीवन विकास ग्रंथालयाचे अध्यक्ष न्या. अंबादासराव जोशी, कार्यवाह डॉ. राजशेखर बालेकर उपस्थित होते. प्रतिवर्षी कै. प्रभाकर भालेराव स्मृतिदिनी कै. के. द.वडजीकर उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार जीवन विकास ग्रंथालयातर्फे दिला जातो पुरस्काराचे हे २५ वे वर्ष आहे. ग्रंथमित्र भा. बा. आर्वीकर सभागृहात संपन्न झालेल्या या पुरस्कार प्रदान सोहळ्याचे प्रास्ताविक कार्यवाह डॉ.राजशेखर बालेकर यांनी केले. गौरवपत्राचे वाचन कोषाध्यक्ष नितीन कंधारकर यांनी केले. यावेळी मनोज वडजीकर, सौ. मोनिका अत्रे, अविनाश भालेराव, सुनील भालेराव, नितीन काजवे, अशोक लाटे, जीवन देसाई, गुलाबराव मगर,. गणेश कुलकर्णी, छाया महाजन, शाम शेलगावकर, काशीनाथ गायकवाड, श्रीकांत काळे, प्रवीण देशपांडे यांचे आप्तेष्टमित्र, वाचक, नागरिक आदी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहकार्यवाह नृसिंह कुलकर्णी यांनी आणि आभार प्रदर्शन महेश बावस्कर यांनी केले.

## पत्र

पत्र म्हणजे
मनातील भाव
कला गुणांना
मिळतो वाव

पत्र म्हणजे
गंमत न्यारी
अचूक जाते
प्रत्येकाच्या घरी

पत्र म्हणजे
आठवणींचा ठेवा
त्यात असतो
खुशालीचा मेवा

पत्र म्हणजे
किमया मोठी
त्यातून होतात
गाठी भेटी

पत्र म्हणजे
विचारांना वाट
मोकळे होतात
शब्दांचे पाट



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि. यवतमाळ**
**मो. ९०११५ ५९१०६**


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


# विधी व सेवा दिन - लोकशाहीचा आत्मा जागवणारा दिवस! न्यायमूर्ती व्यंकटेश गिरवलकर



**लातूर (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** दि. १२/११/२०२५विधी व सेवा दिन हा केवळ औपचारिक दिवस नाही, तर लोकशाहीचा आत्मा जागवणारा दिवस आहे. न्याय ही केवळ कागदावरची संकल्पना नाही ;तर ती प्रत्येक नागरिकाचा श्वास बनावी, तसेच विधी व सेवा दिनाचे उद्देश एनसीसी च्या विद्यार्थ्यांना न्यायमूर्ती व्यंकटेश गिरवलकर यांनी सांगितले.श्री मारवाडी राजस्थान विद्यालयात संपन्न झालेल्या ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. यावेळी मंचावर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. नरसिंग वाघमोडे, कमांडिंग ऑफिसर कर्नल संतोष नौगण , अॅडम ऑफिसर कर्नल वाय.बी. सिंह, राजस्थान विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण खरोसेकर,चीफ ऑफिसर महावीर काळे , सेकंड ऑफिसर नमनगे जगदीश, सचिन गिरवलकर, सुभेदार मेजर शंभू सिंग यांची उपस्थिती होती. न्यायव्यवस्थेला लोकपार्यंत पोहचवण्यासाठी दरवर्षी 9 नोव्हेंबरला विधी व सेवा दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून डॉ. नरसिंग वाघमोडे यांनी ' भारतीय राज्यघटना आणि तिची निर्मिती प्रक्रिया ' या विषयावर अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले. घटनेने दिलेल्या स्वातंत्र्याचा उपभोग घेताना त्याचा दुरुपयोग होऊ नये, संविधानाची पायमल्ली म्हणजे आपल्या लोकशाहीवरचा घाला आहे. त्यामुळे संविधानाचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे डॉ. वाघमोडे म्हणाले. या कार्यक्रमास यशवंत विद्यालय, देशीकेंद्र विद्यालय, श्री मारवाडी राजस्थान विद्यालय, ज्ञानेश्वर विद्यालय, व्यंकटेश विद्यालय, राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील NCC विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बीच एम शिवशंकर निकम, हवालदार संभाजी शिंदे, हवालदार दीपक, हवालदार अमोल मोरे, हवालदार शामराव सोनटक्के यांनी प्रयत्न केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चीफ ऑफिसर महावीर काळे यांनी केले तर आभार जगदीश नमनगे यांनी मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ नोव्हेंबर २०२५


## ग्रामसुराज्य फाऊंडेशन व डॉ. चौरे क्लिनिकतर्फे मोफत आरोग्य शिबिर!




छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) छत्रपती संभाजीनगर येथीलडॉ वर्षा चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि .११ नोव्हेंबर रोजी परिसरातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात वैद्यकीय विद्यार्थिनी कु वैष्णवी गित्ते यांनी सहकार्य केले. परिसरातील स्त्रिया,बालके यांनी शिबिराचा लाभ घेतला.शिबिरास ग्रामसुराज्य फाऊंडेशन छत्रपती संभाजीनगर चे संचालक प्रकाश चोले यांनी भेट देऊन दोन्ही डॉक्टरांचे स्वागत केले. मोफत आरोग्य शिबिराचा लाभ मिळाल्याने परिसरातील नागरिकांनी आनंद व्यक्त करून आभार मानले.

## संकेतस्थळातील बदलांमुळे केवायसी अडचणी, लवकरच निराकरण - तटकरे



**मुंबई :** राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाखो लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत पाठवली जाते, ज्यामुळे महिलांना मोठा आधार मिळतो. सध्या राज्य सरकारने सर्व लाभार्थी महिलांना ई-केवायसी करण्याचे आवाहन केले असून त्यासाठी संकेतस्थळही उपलब्ध करून दिले आहे. मात्र, ही ई-केवायसी करताना येत असलेल्या अनेक तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी प्रशासकीय स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. असे असतानाच, आता महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी सर्व लाभार्थी महिलांना एक महत्त्वाची माहिती देऊन मोठा दिलासा दिला आहे.

मंत्री अदिती तटकरे यांनी माहिती दिली की, लाडकी बहीण योजनेच्या संकेतस्थळामध्ये काही बदल होत आहेत, त्यामुळे वेळ लागत आहे. ज्या महिलेला पती आणि वडील नाही त्यांना केवायसी करता येत नाहीये. हीच अडचण लक्षात घेऊन आता संकेतस्थळात महत्त्वाचे बदल केले जात आहेत. या बदलांमुळे आता सर्व महिलांना केवायसी करता येईल. त्यासाठीच हे बदल केले जात आहेत, असे तटकरे यांनी सांगितले आहे.

केवायसी करण्याची अंतिम मुदत १८ नोव्हेंबर २०२५ आहे. त्यामुळे लवकरात लवकर केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महिलांचा प्रयत्न सुरू आहे. परंतु, सध्या संकेतस्थळात काही बदल केले जात असून त्यामुळे वेळ लागत असल्याची माहिती अदिती तटकरे यांनी दिली आहे. तर मग अंतिम मुदत वाढवून देणार का? असा प्रश्न महिलांनी उपस्थित केला आहे. यावर आता सरकार काय निर्णय घेणार याकडे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

लाडकी बहीण योजनेच्या संकेतस्थळावर सध्या केवायसी करताना खुप अडचण येत आहे. या तांत्रिक अडचणीवर तटकरे यांनी भाष्य करताना म्हटले की, महिलांना येत असलेली तांत्रिक अडचण लक्षात घेण्यात आले आहेत. सध्या संकेतस्थळात काही बदल करण्यात येत आहेत. हे बदल झाल्यानंतर कोणतीही अडचण येणार नाही. लगेच केवायसीची प्रक्रिया पूर्ण होईल, असे आदिती तटकरे यांनी सांगितले आहे.

## डी. बी. जगत्पुरिया यांना जीवनगौरव पुरस्कार



छत्रपती संभाजीनगर : ख्यातनाम कवी, लेखक, समीक्षक प्रा. डी. बी. जगत्पुरिया यांना राज्यस्तरीय आदर्श गुणीजनरत्न जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. कुटासा ता. अकोट येथील तरुणाई फाउंडेशन या संस्थेतर्फे २०२५-२६चा हा पुरस्कार सातव्या अकोला येथे होणाऱ्या अकोला जिल्हा मराठी साहित्य संमेलनात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येईल. प्रा. डी. बी. जगत्पुरिया यांना यापूर्वीही अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यांच्या नावावर अनेक कवितासंग्रह, कथासंग्रह, कादंबऱ्या, समीक्षाग्रंथ अशी मोठी ग्रंथसंपदा आहे. हा जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल डी.बी. जगत्पुरिया यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## सातव्या मजल्यावरून लोखंडी रॉड कोसळला, मुंबई फिरायला आलेल्या नाशिककराचा दुर्दैवी मृत्यू

**मुंबई :** मुंबईतील बांधकाम साईटवरील अपघातांची मालिका चिंताजनक ठरत आहे. जोगेश्वरी परिसरात एका निर्माणाधीन इमारतीतून सिमेंट ब्लॉक डोक्यावर पडून २२ वर्षीय तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, अंधेरी पूर्व येथील मरोळ नाका परिसरात आणखी एक धक्कादायक दुर्घटना घडली आहे. मरोळ नाका मेट्रो स्टेशनखाली 'प्रिविलोन' या विकासकाकडून सुरू असलेल्या एका बांधकाम इमारतीमधून लोखंडी रॉड कोसळल्याने एका ३० वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला.

नाशिकहून मुंबईत फिरण्यासाठी आलेले अमर आनंद पगारे (वय ३०) हे या घटनेचे शिकार ठरले. सकाळीच मुंबईत पोहोचलेल्या अमर पगारे यांचा सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास मरोळ नाका परिसरात, बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या सातव्या मजल्यावरून पडलेल्या लोखंडी रॉडमुळे दुर्दैवी अंत झाला. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी कूपर रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला. या दुर्दैवी घटनांमुळे बांधकाम साईटवर पाळल्या जाणाऱ्या सुरक्षा नियमांवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

मुंबईत बांधकाम इमारतींमधून दगड किंवा लोखंडी रॉड पडून नागरिकांचे मृत्यू होण्याच्या सातत्याने घडणाऱ्या दुर्दैवी घटनांमुळे, गुन्हेगारी, अपघात किंवा बॉम्बस्फोटांमुळे असुरक्षित वाटणारी ही महानगरी आता उंच इमारतींच्या बांधकामामुळेही अधिक असुरक्षित बनल्याची भावना सामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. जोगेश्वरी आणि मरोळ नाका येथील ताज्या घटनांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे आणि सर्वसामान्य मुंबईकर बांधकाम इमारतींची सुरक्षा व्यवस्था रामभरोसे आहे का? असा थेट प्रश्न विचारत आहेत. सध्याच्या घटनेमध्ये चूक नेमकी कोणाची आहे आणि ही दुर्घटना कशामुळे घडली, यासंदर्भात एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ नोव्हेंबर २०२५


# सृष्टी राठोड राज्यस्तरीय दांडपट्टा स्पर्धेत 'रौप्यविजेती'




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** सातारा जिल्ह्यातील वाई-वठार येथे नुकत्याच पार पडलेल्या दुसऱ्या राज्यस्तरीय दांडपट्टा स्पर्धेत मुरुम येथील प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलची विद्यार्थीनी सृष्टी सुनील राठोड (इयत्ता 4 थी) हिने उल्लेखनीय कामगिरी करत सिल्वर मेडल (रौप्य पदक) पटकावले आहे.'परिश्रमाची पराकाष्ठा आणि आत्मविश्वासाची उंच झेप' या उक्तीला साजेसं प्रदर्शन करत सृष्टीने आपली चमकदार कामगिरी साकारली असून तिच्या या यशाने मुरुम आणि शाळेचा अभिमान द्विगुणित झाला आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त माजी मंत्री बसवराज पाटील, बापूराव पाटील, शरण पाटील, सचिव व्यंकटराव जाधव तसेच सर्व संचालक मंडळांनी सृष्टीचे मन:पूर्वक अभिनंदन केले.शाळेतर्फे आयोजित विशेष कार्यक्रमात माजी मुख्याध्यापक सच्चिदानंद अंबर, प्रा. डॉ. पुरुषोत्तम बारवकर, संगमेश्वर लामजने आणि धनराज हळळे यांनी सृष्टीचा सन्मान करून अभिनंदन केले .या प्रसंगी शाळेत मुख्याध्यापिका अनुराधा जोशी, पर्यवेक्षक वीरेंद्र लोखंडे, सुभाष धुमाळ, पंकज पाताळे, सागर मंडले, जगदीश सुरवसे व प्रशालेतील सर्व शिक्षक ,शिक्षिका यांच्या हस्ते सृष्टीचे तीच्या पालका सहीत सत्कार केले .सृष्टीला या यशामागे प्रशिक्षक रफिक शेख यांचे मार्गदर्शन, तसेच वर्गशिक्षिका सोनाली कारभारी व श्रीदेवी मंडले यांचे सातत्याने प्रोत्साहन लाभले.सृष्टीची आता राष्ट्रीय (नॅशनल) पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाली असून सर्व स्तरावरून तिला मन:पूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षिका साक्षी देशमाने यांनी केले तर सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन शिक्षक जगदीश सुरवसे यांनी केले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांचे ॲलिम्को मोजमाप व साहित्य वाटप शिबीर संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** पंचायत समिती कन्नड शिक्षण विभागाच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ॲलिम्को मोजमाप शिबीर व साहित्य साधनाचे वाटप शिबिर आयोजित करण्यात आले होते. यात तालुक्यातील विविध शाळांमधील दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार सहाय्यक सामग्रीचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.या शिबिरामध्ये तालुक्यातील ६१ दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य साधने वाटप करण्यात आले, व ८१दिव्यांग विद्यार्थ्यांचे मोजमाप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विभाग पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी श्री दिवेकर, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा समन्वयक समवेशित शिक्षण गणेश बेडके उपस्थिती होते.यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, "दिव्यांग विद्यार्थी हे समाजाचे अविभाज्य घटक आहेत. योग्य प्रोत्साहन, शिक्षणसुविधा आणि प्रेम मिळाल्यास ते नक्कीच उज्ज्वल भविष्य घडवू शकतात. समाजाने त्यांच्याविषयी संवेदनशील राहून त्यांच्या विकासासाठी योगदान द्यावे," असे आवाहन करण्यात आले.साहित्य हातात मिळताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले. पालकांनीही पंचायत समिती कन्नड शिक्षण विभाग व प्रशासनाचे आभार व्यक्त केले. सदर शिबीर राबविण्यासाठी छत्रपती संभाजी नगर जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अंकित, तसेच अश्विनी लठकर शिक्षणाधिकारी माध्य. जयश्री चव्हाण शिक्षणाधिकारी प्राथ. गीता तांदळे उप शिक्षणाधिकारी प्राथ. नीता श्रीश्रीमाळ उप शिक्षणाधिकारी प्राथ. श्रीमती सबाहत गटशिक्षणाधिकारी कन्नड इत्यादी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी समावेशित शिक्षण विभागातील नितीन वाघ, कडुबा भुसारी, उत्तम आघाडे, प्रशांत अहिरराव, प्रविण वाकेकर, अयुब सय्यद, युनुस सय्यद, असिफ शेख, श्रीमती शेख, निलम परदेशी, अलका गंगुले, दीपा पवार, खुशाल राठोड तसेच सर्व केंद्रप्रमुख व केंद्रीय मुख्यध्यापक यांचे सहकार्य लाभले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम आघाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रविण वाकेकर यांनी मानले.

# शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड येथे "उद्योजकता विकास कार्यशाळा" संपन्न



**कन्नड :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजी नगर विद्यार्थी विकास मंडळ व शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने कन्नड येथे वाणिज्य विभागाच्या वतीने "उद्योजकता विकास कार्यशाळा" चे आयोजन करण्यात आले होते या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये उद्योगशीलता, स्वावलंबन आणि नवकल्पनाशीलतेचा विकास घडविणे हा होता. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान, उपप्राचार्य डॉ बी के मगर यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. दिलिप चव्हाण, प्राध्यापक, सरस्वती भुवन महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित होते. "उद्योजकता: आज आणि उद्या" या विषयावरील प्रेरणादायी मार्गदर्शनात त्यांनी सांगितले की, "यशस्वी उद्योजक बनण्यासाठी चिकाटी, आत्मविश्वास आणि सातत्य आवश्यक आहे. नोकरी मागणारे नव्हे, नोकरी देणारे बना."असे आव्हान केले, तसेच २१ व्या शतकातल्या उद्योग विश्वातील संधी शोधा व त्याचं सोनं करा असा कानमंत्र कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन करत असताना डॉ. मंगेश जाधव यांनी विद्यार्थ्यांना दिला,या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर यांनीही अध्यक्षीय समारोप करताना विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे महत्त्व पटवून दिले.पाहुण्याचा परिचय डॉ. राकेश अहिरराव यांनी करून दिला, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मीना वडगुळे यांनी केले.या कार्यशाळेत विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय कल्पना सादरीकरण, समूहचर्चा आणि संवाद सत्रांचे कसे असावे या बाबत मार्गदर्शन करण्यात आले ,विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग नोंदवत विविध उद्योग कल्पना मांडल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि स्वावलंबनाची भावना दृढ झाली.या कार्यशाळेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये उद्योग क्षेत्राविषयी जागरूकता आणि नवनवीन कल्पना रुजविण्याचा प्रयत्न यशस्वी ठरला.या कार्यशाळेस वाणिज्य विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १३ नोव्हेंबर २०२५

# दयाळूपणा : मानवी अस्तित्वाचा जिवंत आधार

**मा**नवी जीवनाची मूलभूत रचना ही परस्परावलंबनावर आधारलेली आहे. आपण एकमेकांशिवाय जगू शकत नाही ही वस्तुस्थिती जशी खगोलशास्त्रीय तत्त्वांनी सिद्ध होते, तशीच ती समाजशास्त्रीय आणि मनोवैज्ञानिक अभ्यासांतही सिद्ध होते. माणूस हा सामाजिक प्राणी आहे ही परिभाषा केवळ पाठ्यपुस्तकातील ओळ म्हणून आपण स्वीकारली असली तरी या वाक्यातील 'सामाजिक' या शब्दाच्या मागे दडलेले सर्वांत संवेदनशील, सुक्ष्म आणि गहीरे तत्त्व म्हणजेच दयाळूपणा होय. याच भावनेची जाणीव तेव्हा आणखी स्पष्ट होते, जेव्हा आपण 13 नोव्हेंबर रोजी साजरा होणारा 'जागतिक दयाळूपणा दिवस' साजरा करतो. या दिवसाचे औचित्य आपल्याला केवळ एखादी औपचारिक स्मृती नव्हे, तर मानवी सभ्यतेच्या मूळ आत्म्याची पुनश्च आठवण करून देते. दयाळूपणा हा कोणत्याही अर्थाने केवळ दान करणे, मदत देणे, सहानुभूती व्यक्त करणे एवढ्यावर मर्यादित न राहता, हा माणसाच्या व्यक्तिमत्वाचा, विचारप्रणालीचा आणि सामाजिक व्यवहार संस्कृतीचा केंद्रबिंदू आहे.

इतिहासाच्या पृष्ठांवर नजर टाकली तर जगातील सर्व धर्म, तत्त्वज्ञान, समाजव्यवस्था आणि क्रांतिकारक विचारधारा 'दयाळूपणाला' मानवी जीवनाच्या अविभाज्य घटकाच्या रूपाने मांडताना दिसतात. गौतम बुद्धांच्या करुणावादापासून महावीरांच्या अहिंसेपर्यंत, सूफी संतांच्या प्रेमसंवादापासून संत तुकारामांच्या वारकरी भावपरंपरेपर्यंत, गांधीजींच्या 'अहिंसा आणि सत्य' तत्त्वज्ञानापासून ते आधुनिक काळातील मानवतावादी चळवळींपर्यंत सर्वांनी दयाळूपणाला मानवी प्रगतीचे मूळ स्वरूप मानले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर दयाळूपणा ही मानवी संबंधांची बंधरचना दृढ करणारी अदृश्य साखळी आहे. कुठलीही संस्कृती परस्परांतील विश्वास, आदर आणि सहजीवन यांवर उभी असते. आणि या तिन्ही मूल्यांच्या पायावर दयाळूपणाचा कौल असणे आवश्यक असते. दयाळूपणा नसलेली व्यक्ती केवळ भौतिकदृष्ट्या यशस्वी होऊ शकते, परंतु मानवी अर्थाने ती परिपूर्ण होत नाही.

असे असताना आजच्या जागतिकीकरणाच्या, यांत्रिकीकरणाच्या, तंत्रज्ञानाधारित वेगवान जीवनशैलीने मानवी संवाद अधिकाधिक डिजिटल केला आहे. संदेश, अभिवादन, चिंता, जवळीक यांना भौतिक स्वरूपापेक्षा डिजिटल स्वरूप प्राप्त झाले. भावनांची देवाणघेवाण ही प्रत्यक्ष संवादातून न होता आभासी माध्यमांद्वारे व्हायला लागली. या प्रक्रियेत एक महत्त्वाची गोष्ट हरवू लागली ती म्हणजे भावनिक जवळीक होय. जवळीक कमी झाल्यावर हळूहळू करुणा कमी होते, करुणा कमी झाली की दयाळूपणा कमी होतो. एखाद्याचे दु:ख पाहणे, त्याच्या डोळ्यांतील पाणी ओळखणे, त्याच्या आवाजातील वेदनेचा सूर जाणवणे ही क्षमता कमकुवत होऊ लागली. समाजशास्त्र सांगते की जेव्हा समाजाची भावनिक संवेदनशीलता घटते तेव्हा समाजात स्वार्थ, भेदभाव, विभाजन, असहिष्णुता, हिंसा आणि तणाव वाढू लागतात. आणि हेच आपण जगभरात विविध स्वरूपांत पाहू लागलो आहोत.

आजचे जग भांडवलशाहीच्या स्पर्धात्मक मूल्यांनी व्यापलेले आहे. इतरांपेक्षा पुढे जाणे, अधिकाधिक मिळवणे, यशाचे मोजमाप आर्थिक आणि भौतिक निकषांनी करणे आणि त्यामध्ये मानवी संबंध आणि भावनिक मूल्यांकडे दुर्लक्ष करणे हा प्रवाह वाढतो आहे. समाजशास्त्रीय भाषेत याला 'मानवीकरणाचा क्षय' (Dehumanization) म्हणतात. ज्या समाजात दयाळूपणाचा अभाव वाढतो त्या समाजात व्यक्तींची ओळख त्यांच्या हक्कांपेक्षा कर्तव्यांच्या मर्यादेत, संबंधांपेक्षा व्यवहारांमध्ये, भावना पेक्षा तर्काच्या कोरडेपणात अडकू लागते. आणि अशावेळी दयाळूपणा हा केवळ नैतिक मूल्य नसून समाजाच्या पुनरुज्जीवनाचा मार्ग बनतो. कारण दयाळूपणाचे एक विलक्षण वैशिष्ट्ये म्हणजे तो 'वाटला' की कमी न होता अधिक वाढतो.

दयाळूपणाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सहानुभूतीहोय. म्हणजे 'समोरच्या व्यक्तीच्या परिस्थितीचे, वेदनेचे, आनंदाचे, असुरक्षिततेचे अचूक भान निर्माण करणे'. केवळ समजून घेणे नाही तर त्या जाणिवेतून कृतीकडे जाणे हा खरा दयाळूपणा होय. एखाद्या वृद्ध व्यक्तीला रस्ता ओलांडण्यास मदत करणे, परीक्षेत अपयशी झालेल्या विद्यार्थ्याला आधार देणे, निराश झालेल्या मित्राच्या मनातील गुंता समजून घेणे, भुकेलेल्या व्यक्तीस अन्न देणे, वा फक्त कोणाच्या दु:खाच्या क्षणी काहीच बोलू न देता शांतपणे सोबत राहणे या कृतींचे मूल्य पैशात मोजता येत नाही, पण या कृती मनुष्याला मनुष्य म्हणून सिद्ध करतात.

सध्याच्या काळात जागतिक स्तरावर विविध मानवी संकटे उभी आहेत; युद्धे, स्थलांतर, दारिद्र्य, सामाजिक असमानता, पर्यावरणीय संकटे, मानसिक आरोग्याचे प्रश्न, तुटलेली कुटुंबव्यवस्था, वाढता तणाव, असहिष्णुता, सायबर धमक्या, सोशल मीडियामुळे निर्माण होणारी तुलना आणि कमतरतेची भावना इत्यादी. या सर्व समस्यांमागे एक अदृश्य पण प्रमुख कारण दिसते ते म्हणजे मानवी संबंधांची पोकळी होय. ही पोकळी दयाळूपणानेच भरता येते. दयाळूपणा हा मानसिक आरोग्यासाठी औषध आहे, सामाजिक ऐक्याचा पाया आहे, संघर्ष निराकरणाचे साधन आहे आणि मानवी अस्तित्व टिकवून ठेवण्याचे मूलतत्त्व आहे.

दयाळूपणाचे समाजशास्त्रीय एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे 'सामाजिक भांडवल' (Social Capital) होय. जेव्हा समाजातील लोक एकमेकांशी सहानुभूतिपूर्ण, सहयोगी आणि विश्वासू संबंध राखतात तेव्हा समाज अधिक सुदृढ, सुरक्षित आणि प्रगत होतो. दयाळूपणा वाढला की समुदायांमध्ये एकत्रित कार्यक्षमता वाढते. उदा. एखाद्या गावात किंवा वस्तीत संतुलित आणि मदतशील वातावरण असल्यास त्या ठिकाणी गुन्हेगारी कमी असते, एकोपा अधिक असतो, संकटात सर्व एकत्र उभे राहतात, आणि विकासाची प्रक्रिया अधिक सुकर होते. म्हणजेच दयाळूपणाचा समाजावर व्यापक आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिणामही असतो.

शाळा, कुटुंब, मित्रमंडळी, समाजसंस्था आणि शासनव्यवस्था या सर्व पातळ्यांवर दयाळूपणा हे मूल्य पेरणे गरजेचे आहे. बालक हा जे पाहतो ते शिकतो. जर घरातील वातावरण करुणामय, जिव्हाळ्याचे, संवेदनशील असेल तर मूलही तसेच मूल्य आत्मसात करते. शाळांनी फक्त स्पर्धा नव्हे तर सहकार्य, परस्पर मदत, समूहभावना, विविधतेचा सन्मान ही मूल्ये शिकवणे आवश्यक आहे. समाजातील माध्यमांनी हिंसा, द्वेष, भेदभाव, असहिष्णुता यांना हवा देण्याऐवजी मानवतेचे उदाहरण घडवणाऱ्या कथा पुढे आणल्या पाहिजेत. शासनाच्या धोरणांतही दुर्बल घटक, वंचित समुदाय, अपंग, वृद्ध, अनाथ, महिला आणि पीडित यांच्यासाठी आधारयोजना दयाळूपणेच्या भावनेतूनच प्रभावीपणे लागू केल्या जाऊ शकतात.

दयाळूपणा हा एखाद्याने 'जास्त' आणि एखाद्याने 'कमी' असा मोजण्याचा विषय नाही. दयाळूपणा हा प्रत्येकासाठी साधा, सहज आणि सर्वांच्या आवाक्यातील भाव आहे. आपण ज्या क्षणी एखाद्याच्या चेहऱ्यावर हास्य आणतो, त्या क्षणी आपण जग थोडेसे अधिक सुंदर बनवत असतो. आणि जग सुंदर व्हावे यासाठी मोठमोठे जागतिक करार किंवा महाकाय क्रांतींची गरज नसते तर गरज असते ती प्रत्येक मनातील लहान, सोप्या आणि सातत्यपूर्ण दयाळूपणाच्या कृतीची.

शेवटी, दयाळूपणा हा कोणताही 'दिवस' नसून जीवनशैली आहे. हा दिवस आपल्याला केवळ स्मरण देते की आपण माणूस म्हणून जगण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. आपण कितीही विकसित, शिक्षित, सक्षम किंवा संपन्न झालो तरी 'दयाळूपणा' नसल्यास आपण अपूर्ण आहोत. म्हणूनच या जागतिक दयाळूपणा दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने स्वत:ला एक साधा प्रश्न विचारावा की मी कुणासाठी आज 'थोडेसे अधिक माणूस' होऊ शकतो? या प्रश्नाचे उत्तर म्हणजेच मानवतेचा खरा उत्सव होय. कारण जग बदलण्यासाठी कधीकधी मोठा अभिमान नको असतो तर फक्त एक छोटासा दयाळू हात पुरेसा असतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. क्र. 9960103582**
**bagate.rajendra५@gmail.com**

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
• महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
• सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
• शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
• हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.
डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.